# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३५/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. नामदेवराव सुं. अहिरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का),**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त पी/दक्षिण विभाग,
सिटी सेंटर मॉलसमोर, एस.व्ही.रोड, गोरेगाव (पश्चिम) मुंबई -४०० १०४

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त पी/दक्षिण विभाग,
सिटी सेंटर मॉलसमोर, एस.व्ही.रोड, गोरेगाव (पश्चिम) मुंबई -४०० १०४

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ३५७६/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १४३८/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. २६.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"ज्याअर्थी व्दितीय अपील अर्ज कलम १९(३) च्या तरतुदीप्रमाणे नाही, या कारणामुळे व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे. जर या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली तर त्यावर सुनावणी साठी प्राधान्य देण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ११.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)- २ पी/ दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, पी/ दक्षिण विभाग यांचे कार्यालय, गोरेगाव (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. २४.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)- २ पी/ दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त, पी/ दक्षिण विभाग यांचे कार्यालय, गोरेगाव (प.), मुंबई यांच्याकडून दि.०३.०३.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी नमुद केले की, श्री. नामदेवराव सु. अहिरे यांनी प्रथम अपिल दाखल केले व त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०७.२०१८ रोजीच्या आदेशान्वये अपिलकर्त्यास सुधारित उत्तर तसेच, उपलब्ध माहिती विनामुल्य देण्याचे आदेश पारित केले. सदर आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ.वका.), पी/दक्षिण विभाग यांनी पत्र क. सआपी/द/बी-५६/०७८३३/स.अ.(इ.व का.)-२ दि.०१.०८.२०१८ अन्वये सुधारित पत्रोत्तर दिले. तसेच, त्यांच्या तकार अर्जावर या कार्यालयामार्फत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे व कारवाईबाबतचे कागदपत्र उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना काही माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचा अहवाल दि. ०३.०३.२०२० निदर्शनास आणून नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२०१८ रोजी अपिलार्थीना (सध्याचे तक्रारकर्ता) सुधरीत उत्तर देण्याचे आदेशित केले होते. त्याप्रमाणे दि. ०१.०८.२०१८ रोजी अपिलार्थी (सद्याचे तक्रारकर्ता) यांना माहिती कळविण्यात आली आहे. सुनावणी वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी दि. ०१.०८.२०१८ रोजीच्या पत्राची प्रतची मागणी केली. सदर पत्र तक्रारकर्ता यांना देण्यात आले व तक्रारकर्ता यांनी ते स्विकारले.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
8-10-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०८.१०.२०२५**